# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 10 | **Subject:** Marathi | **Time:**1 hrs
**Date:** 04-08-2025 | **Paper:** Unit 1 | **Marks:**20

**Q1) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(7)**

(1) चौकटी पूर्ण करा : (2)


(i) उताऱ्यात आलेले नदीचे नाव - ........................................

(ii) बाळाची आई करत असलेला उदयोग - ........................................

पूढे बाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या | छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उदयोगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने 'कुडकुडत रडत होते. पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्रा राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित शाल काढली, पाचपन्नास | रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, "त्या बाळाला आधी शालीत | गुंडाळ आणि मग मासे मारत वैस." या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिमाणतः त्यांच्या कार्यक्रमानां अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे."

(2) आकृतिबंध पूर्ण करा : (2)




(3) स्वमत : (3)

'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

**Q2) कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **(8)**

(1) खालील कृती केव्हा घडतात, ते लिहा : (2)

(i) माता धावून जाते ..................

(ii) धरणीवर पक्षिणी झेपावते ..................

(iii) गाय हंबरत धावते ..................

(iv) हरिणी चिंतित होते ..................

अग्निमाज पडे बाळू।
माता धांवें कनवाळू॥ १ ॥

तैसा धांवें माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा॥ २ ॥

सर्वोचि पावें पक्षिणी।
पिलीं पडतांचि धरणीं॥ ३ ॥

TickMark.Ai

भुकेलें वत्सरावें।
धेनु हुंबरत धांवे॥ ४ ॥

वणवा लागलासे वर्नी।
पाडस चिंतीत हरणी॥ ५ ॥

नामा म्हणे मेघा जैसा।
विनवितो चातक तैसा॥ ६ ॥

(2) कोण ते लिहा : (2)

(i) परमे वर कृपेची याचना करणारे – .................
(ii) मेघाची विनवणी करणारा – .................
(iii) भुकेलेले – .................
(iv) भक्ताच्या हाकेला धावून येणारा – .................

(3) आई, प्राणी, पक्षी यांच्या मातृप्रेमाचे कवितेतून व्यक्त झालेले वर्णन तुमच्या शब्दांत लिहा. (2)

(4) तैसा धांवें माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ॥ या ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.’ (2)

**Q3) व्याकरण घटकांवर आधारित कृती :** **(5)**

(1) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा (1)

अंगावर खवले असणारा -

(2) वचन बदला (1)

(i) पैसा -
(ii) नाला -

(3) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा (1)

(1) लहान x        (2) ज्ञान x

(4) कंसातील सूचनेनुसार वाक्य रुपांतर करून वाक्ये पुन्हा लिहा (1)

ताई उंच आहे. (नकारार्थी करा)

(5) लिंग ओळखा (1)

(i) वासरू -
(ii) चिमणा -

All the Best

TickMark.Ai